(33)

Appendix-I

**BEFORE THE LOK ADALAT HELD AT AHMEDPUR**

[Organized by **TLC Ahmedpur** Authority/ Committee under Section 19, of the Legal Services Authorities Act, 1987(Central Act)]

नि. ९२

वादी

वादी :- **सादीक पि. अहमदपाशा शेख** वय ४७ वर्षे धंदा व्यापार
रा. अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर

वि रु ध्द

Id by
Adv. A.B. Pathan

प्रतिवादी

प्रतिवादी :- १) **शेख साजेद पि. शेख हाजी** वय ३७ वर्षे धंदा नौकरी
रा. कंधार ता. कंधार जि. नांदेड

२) **विशाल पि. संजय कांबळे** वय ३३ वर्षे धंदा व्यापार
रा. अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर

३) **सुरेश पि. अंबादास दुधाटे** वय ३३ वर्षे धंदा व्यापार
रा. खंडाळी ता. अहमदपूर जि. लातूर

R.C.S. No. 123 /**2026** of proceedings of the Court **C.J.J.D.**

Present:-

Name of Judicial Officer/: Ms. S. R. Sarode

Retired Judicial Officer ____________________

Name of Members : (1) Adv. P.M. Gaikwad

(2) ____________________

Id by

**AWARD**

The dispute between the parties having been referred for determination to the Lok Adalat and the parties having compromised/settled the case/matter, the following award is passed in terms of the settlement:

**दावा :-** **सामान्य विभाजन आणि हिश्याचे पृथ्थकरण करण्यासाठीचा दावा.**

**<u>तडजोडपत्र</u>**

हे की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये खालीलप्रमाणे तडजोड झालेली आहे.

१) हे की, वादी व प्रतिवादी हे वरील ठिकाणचे रहिवाशी असून आपसामध्ये चांगले मित्र आहेत, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

२) हे की, वादी व प्रतिवादी हे पंचायम समिती अहमदपूर व नगर परिषद अहमदपूरच्या हद्दीतील मौ. मरशिवणी ता. अहमदपूर जि. लातूर येथील जमीन सर्वे नं. २४/१/१ पूर्ण क्षेत्र ० हे १० आर आकार ० रु १० पैसे ज्याची चर्तुसिमा पूर्वेस- रस्ता, पश्चिमेस- सर्वे नं. २४/११/१ मधील विक्रेत्याची शिल्लक जमीन, दक्षिणेस- महसुल कॉलनीची वसाहत व उत्तरेस- सर्वे नं. २४/१/१ मधील विक्रेत्याची शिल्लक जमीन. येणेप्रमाणे सदरील चर्तुसिमेच्या आतील असलेल्या जमीनीचे एकत्ररित्या मालक व ताबेदार आहेत, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

३) हे की, सदरील जमीन वादी व प्रतिवादी यांनी एकत्ररित्या दि. ३०.१०.२०२५ रोजी रक्कम रु. ८,२०,०००/- च्या मोबदल्यात अशोक



Scanned with OKEN Scanner

राजाराम फड यांचेकडून रजिस्टर्ड खरेदीखत क्र. ३९६०/२०२५ अन्वये खरेदी केलेली आहे. खरेदीनुसार वादी व प्रतिवादी यांच्या नावे सदर जमीनीचा फेर मंजूर झालेला आहे, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

४) हे की, वादी व प्रतिवादी यांचेतील भावी संबंध चांगले रहावेत म्हणून त्यांच्यामध्ये दि. १३.०३.२०२६ रोजी बैठक घेवून पंचानी तडजोड घडवून आणली आहे, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

५) हे की, सदरील तडजोडीअधारे **वादी सादीक** हा मौ. मरशिवणी ता. अहमदपूर जि. लातूर हद्दीतील जमीन सर्वे नं. २४/१/१ पूर्ण क्षेत्र ० हे १० आर आकार ० रु १० पैसे पैकी जमिन. ज्याचे क्षेत्र ० हे ०१.६२ आर आकार ० रु ०२ ज्याची चर्तुसिमा पूर्वेस- रस्ता, पश्चिमेस- अशोक फड यांची जमीन, दक्षिणेस- महसुल कॉलनी व उत्तरेस- प्रतिवादी क्र. २ यांचे हिस्सेची जमीन, येणेप्रमाणे सदरील चर्तुसिमेच्या आतील जमीनीचा वादी सादीक हा प्रत्यक्ष मालक व कब्जेदार असल्याचे प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

६) हे की, सदरील तडजोडीअधारे **प्रतिवादी क्र. १ साजेद** हा मौ. मरशिवणी ता. अहमदपूर जि. लातूर हद्दीतील जमीन सर्वे नं. २४/१/१ पूर्ण क्षेत्र ० हे १० आर आकार ० रु १० पैसे पैकी जमिन. ज्याचे क्षेत्र ० हे ०५ आर आकार ० रु ०५ ज्याची चर्तुसिमा पूर्वेस- रस्ता, पश्चिमेस- अशोक फड यांची जमीन, दक्षिणेस- प्रतिवादी क्र. २ यांचे हिस्सेची जमीन व उत्तरेस- अशोक फड जमीन, येणेप्रमाणे सदरील



Scanned with OKEN Scanner

चर्तुसिमेच्या आतील जमीनीचा प्रतिवादी क्र. १ साजेद हा प्रत्यक्ष मालक व कब्जेदार असल्याचे प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

७) हे की, सदरील तडजोडीअधारे **प्रतिवादी क्र. २ विशाल व प्रतिवादी क्र. ३ सुरेश** हे एकत्ररित्या मौ. मरशिवणी ता. अहमदपूर जि. लातूर हद्दीतील जमीन सर्वे नं. २४/१/१ पूर्ण क्षेत्र ० हे १० आर आकार ० रु १० पैसे पैकी जमिन् ज्याचे क्षेत्र ० हे ०१.११ आर आकार ० रु ०१ पैसे ज्याची चर्तुसिमा पूर्वेस- रस्ता, पश्चिमेस- अशोक फड यांची जमीन, दक्षिणेस- वादी यांचे हिस्सेची जमीन व उत्तरेस- प्रतिवादी क्र. १ यांचे हिस्सेची जमीन, येणेप्रमाणे सदरील चर्तुसिमेच्या आतील जमीनीचे प्रतिवादी क्र. २ विशाल व प्रतिवादी क्र. ३ सुरेश हे एकत्ररित्या प्रत्यक्ष मालक व कब्जेदार असल्याचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

८) हे की, सदरील तडजोडीमध्ये **वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३** यांनी मौ. मरशिवणी ता. अहमदपूर जि. लातूर हद्दीतील जमीन सर्वे नं. २४/१/१ पूर्ण क्षेत्र ० हे १० आर आकार ० रु १० पैसे पैकी उर्वरीत क्षेत्र ० हे ०२.२७ आर जमीन वादी व प्रतिवीद यांनी वर वाटून घेतलेल्या जमिनीमध्ये जाणेयेणेसाठी पूर्वेकडून रस्ता म्हणून सामाईक जमीन सोडलेली आहे, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

९) हे की, वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वरील वाटणीप्रमाणे त्यांचे-त्यांचे हिस्सेवर मालक म्हणून ताबेदार आहेत व ते यापुढे एकमेकांच्या मालकी व ताबेस अडथळा करणार नाहीत व सदर तडजोडीप्रमाणे वाटून



Scanned with OKEN Scanner

आलेल्या जमीनीचा फेरफार अमल ७/१२ व न.प. अहमदपूर रेकॉर्डला ज्याचे त्यांनी ज्याचे त्याचे नावे करुन घेण्यारा वादी व प्रतिवादीचा एकमेकास ऊजर व आक्षेप राहीला नाही. हे वादी व प्रतिवादींना मान्य व कबुल आहे.

१०) हे की, सदर तडजोडीचा खर्च ज्याचा त्याने सोसावा असे ठरले आहे.

दि. १४.०३.२०२६

वादी

**सादीक पि. अहमदपाशा शेख**
रा. अहमदपूर ता. अहमदपूर

प्रतिवादी

**१) शेख साजेद पि. शेख हाजी**
रा. कंधार ता. कंधार जि. नांदेड

**२) विशाल पि. संजय कांबळे**
रा. अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर

**३) सुरेश पि. अंबादास दुधाटे**
रा. खंडाळी ता. अहमदपूर जि. लातूर

मार्फत

**ॲड. ए. बी. डक**
अहमदपूर

मार्फत

**ॲड. ए. एस. पाटील**
अहमदपूर

The parties are informed that the court fee, if any, paid by any of them shall be refunded.
Date : 14.03.2026

14/3/26
Head of Pannel

14/3/2026
Member

Member

(Seal of the Authority/Committee)



Scanned with OKEN Scanner